प्रेसनोट

दि. ३१/०५/२०२१

# लाच स्वीकारले प्रकरणी वकीलावर कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | हरिकिशन श्रीरामजी सोनी, वय - ३९ वर्षे, व्यवयाय - वकील कौटुंबिक न्यायालय, शिवाजीनगर पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- (दहा हजार रूपये) |
| लाच स्वीकारली रक्कम | १०,०००/- (दहा हजार रूपये) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी दिनांक :- दि. २७/०५/२०२१<br>सापळा दिनांक :- ३१/०५/२०२१<br>महिला तक्रारदार यांचा कौटुंबिक न्यायालयामध्ये खटला सुरू असून तो खटला चालविण्यासाठी तक्रारदार यांनी डिस्ट्रीक्ट लीगल सर्व्हीसेस ॲथोरिटी पुणे याना विनंती केल्यावरून डिस्ट्रीक्ट लीगल सर्व्हीसेस ॲथोरिटीने वकील हरिकिशन सोनी यांची नियुक्ती केली होती व या ॲथोरिटीकडून त्यांना शासनाकडून फी अदा करण्यात येते. तसेच सदर नियुक्ती आदेशामध्ये यातील तक्रारदार यांनी वकीलांना कोणतीही रक्कम देण्याची गरज नाही असे नमूद असतानासुद्धा नमूद आरोपी वकील यानी १०,०००/- रूपयांची लाचेची मागणी करून स्वीकारली.<br>शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू असून तपास श्रीमती सीमा मेहेंदळे, सहायक पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. पुणे युनिट या करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे, श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे,पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. फेसबुकपेज- www.facebook.com-maharashtraACB
७. वेबसाईट- www.acbmaharashtra.gov.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.